" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे**

# विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

**15 ऑगस्ट, 2024 स्वातंत्र्य दिन उपक्रम**

## अहवाल

गुरुवार दि.15.08.2024 रोजी ठीक 7.45 वाजता कॉलेजच्या प्रांगणात भारतीय स्वातंत्र्याचा 78 वा स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न झाला. प्रमुख पाहुणे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा मा.प्राचार्या सौ.शुभांगी गावडे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी मा.श्री. कौस्तुभ गावडे, कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर. आर. कुंभार इ.मान्यवर उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सी. ई. ओ. मा. श्री. कौस्तुभ गावडे ध्वजारोहण प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की , आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये शिक्षकांचा वाटा मोलाचा असून आपल्या देशाची चौफेर प्रगती होत आहे. जागतिक स्तरावर आर्थिक मंदीला जग झुंज देत असताना आपला देश आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येत आहे. देशासाठी लढणाऱ्या शूरवीरांच्या व स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानानेच देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. आजच्या युवकांनी राष्ट्र ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे. एनसीसी विद्यार्थ्यांच्या वतीने उत्तम प्रकारे संचलनाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या परिसरातील सर्व शाखाप्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

सदर स्वातंत्र्य दिन कार्यक्रमास कॉलेज प्रशासन, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जे आर भरमगोंडा, प्रा.संतोष कुंडले, समीर पठाण, ज्युनियर व सीनियर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर व न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मा.प्राचार्य आर आर कुंभार, प्रबंधक श्री आर.बी.जोग यांचे विशेष सहकार्य लाभले.

श्री. एल. एस. नाकाडी
PROGRAMME OFFICER
N. S. S + 2
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# स्वातंत्र्य दिन

दि. 15.8.2024







